


सायं दैनिक सोलापूर
# कटूसत्य
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No. MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ६२ वा | गुरुवार दि. २४ सप्टेंबर २०२६ | पाने ४ | पोस्ट परवाना:- SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# दुष्काळी परिस्थितीत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी; थेट मदत करणार- मुख्यमंत्री फडणवीस

## साहेब, पाणी द्या. मुलांची लग्नं जमत नाहीत; बार्शीच्या तरुणाची मुख्यमंत्र्यांकडे आर्त हाक

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- राज्यातील इतर भागांप्रमाणेच सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, शेतकऱ्यांना थेट मदत करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी बार्शी तालुक्यातील धानोरे येथे नुकसानग्रस्त सोयाबीन पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, आमदार राजेंद्र राऊत, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार समाधान आवताडे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, माजी आमदार राम सातपुते, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुने, बार्शी चे तहसीलदार एफ. आर. शेख यांच्यासह संबंधित अधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सोलापूर जिल्ह्यात पावसाअभावी दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यात सरासरीच्या सुमारे ५० टक्केच पाऊस झाला असून, खरीप हंगामातील जवळपास सर्व पिकांचे नुकसान झाले आहे. धानोरेसह बार्शी तालुक्याच्या या परिसरात सुमारे ९० हजार हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन पिकांचे १०० टक्के नुकसान झाले आहे. दुष्काळी परिस्थितीकडे शासन गांभीर्याने लक्ष देत असून, शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्यासाठी लवकरच शासन निर्णय (जीआर)



काढण्यात येईल. मदत थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा, अन्नधान्य तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काचा प्रश्न याबाबत शासन लवकरच निर्णय घेणार आहे. आगामी काळात रब्बी हंगामासाठी पाणी उपलब्ध झाले, तर त्या अनुषंगाने शेतकऱ्यांना आवश्यक मदत करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

उजनी धरणातील उपलब्ध पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याबाबतही शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येणार आहे. पालकमंत्री गोरे व आमदार राऊत यांनी सोलापूर जिल्ह्यात पाणी आणण्यासाठी मांडलेल्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासन सकारात्मक असून, त्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

दरम्यान, फ्लड डायव्हर्शन'च्या माध्यमातून उजनी धरणात पाणी आणण्याच्या प्रस्तावावरही कार्यवाही सुरू आहे. या प्रकल्पाला जागतिक बँकेची मंजुरी मिळाली असून, त्याची निविदा प्रक्रिया सुरू आहे. या माध्यमातून उजनीत पाणी आणल्यानंतर सोलापूर जिल्ह्यासह लगतच्या मराठवाड्यातील धाराशिव, लातूर आणि बीड जिल्ह्यांनाही त्याचा लाभ मिळणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यात पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने खरीप

(पान २ वर)



**पाणी नसल्यामुळे मुलांची लग्नं जमत नाहीत**

"मुख्यमंत्री साहेब, बार्शीला पाणी नसल्यामुळे इथल्या मुलांची लग्नं जमत नाहीत," अशी व्यथा समाधान शिंदे यांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडली. पाण्याअभावी शेतीचं मोठं नुकसान होत असून, त्याचा परिणाम तरुणांच्या लग्नांवरही होत असल्याचं त्यांनी सांगितलं. त्यामुळे बार्शी तालुक्यासाठी उजनी धरणातून शक्य तितकं पाणी वळवावं, अशी मागणी त्यांनी यावेळी मुख्यमंत्र्यांकडे केली.

**उजनीतील गाळ उपशाच्या निविदा लवकरच**

उजनी धरणातील गाळाच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. पहिल्या टप्प्यात राज्यातील ज्या पाच प्रमुख धरणांची गाळमुक्तीसाठी निवड करण्यात आली आहे, त्यामध्ये उजनीचा समावेश आहे. या कामाच्या निविदा तातडीने प्रसिद्ध केल्या जात आहेत.

# मातंग समाजाचे प्रश्न मार्गी लावू- जयकुमार गोरे

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण विलंब न करता लागू करावे, या प्रमुख मागणीसाठी सकल मातंग समाज महाराष्ट्र राज्याच्या वतीने २९ सप्टेंबर रोजी मुंबईतील आझाद मैदानावर महामोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर सकल मातंग समाज सोलापूर शहर-जिल्हा शिष्टमंडळाने राज्य समन्वयक सुरेश पाटोळे यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन मागण्यांबाबत सविस्तर माहिती दिली.

सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणासंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय



देत राज्यांना अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याचा मार्ग स्पष्ट केला आहे. शिक्षण आणि नोकरीतील आरक्षणाचा लाभ अनुसूचित जाती-जमातींमधील विविध घटकांना समन्यायी पद्धतीने मिळावा, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचे शिष्टमंडळाने सांगितले.

मातंग व तत्सम महादलित समाजघटकांना गेल्या अनेक दशकांत आरक्षणाचा अपेक्षित लाभ मिळालेला नसल्याचा दावा यावेळी करण्यात आला. शिक्षण, रोजगार तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये या घटकांचा अपेक्षित सहभाग वाढलेला नसल्याने आरक्षणाच्या लाभाचे समन्यायी वाटप करण्यासाठी उपवर्गीकरण आवश्यक असल्याचे शिष्टमंडळाने स्पष्ट केले.

महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा अभ्यास करण्यासाठी नियुक्त केलेल्या माजी न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे. या अहवालाच्या आधारे अनुसूचित जातींमधील अंतर्गत विषमता कमी करून आरक्षणाचा लाभ वंचित घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी उपवर्गीकरणाचा कायदा तातडीने मंजूर करावा, अशी मागणी २९ सप्टेंबरच्या महामोर्चातून करण्यात येणार आहे.

महामोर्चाच्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आंदोलकांची भेट घेऊन समाजाच्या मागण्या समजून घ्याव्यात आणि त्यावर ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणीही शिष्टमंडळाने पालकमंत्री गोरे यांच्याकडे केली.

यावेळी जयकुमार गोरे यांनी मातंग समाजाच्या राज्यव्यापी महामोर्चास सहकार्य करण्याचे तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट व वेळ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी युवा नेते गोविंद कांबळे, महादेव भोसले यांच्यासह समाजाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोफत आरोग्य तपासणी शिबिरात ७५ नागरिकांची तपासणी

## श्री गणेश मित्र मंडळ आणि बी. नारायणा फाउंडेशन यांचा स्तुत्य उपक्रम

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- श्री गणेश मित्र मंडळ, गांधीनगर भाग-१, अक्कलकोट रोड, सोलापूर आणि बी. नारायणा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराच्या प्रारंभी डॉ. समर्थ वाले यांच्या हस्ते श्री गणेश मूर्तीचे पूजन करण्यात आले.




या शिबिरात एकूण ७५ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर नागरिकांना आवश्यकतेनुसार मोफत गोळ्या व औषधांचे वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. समर्थ वाले यांनी नागरिकांना आरोग्याचे महत्त्व पटवून देत नियमित आरोग्य तपासणी, योग्य आहार आणि निरोगी जीवनशैलीचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

बी. नारायणा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शंकर बटगिरी यांनी, "आपली दिनचर्याच स्वतःचे आरोग्य जपण्यासाठी मूलमंत्र आहे," असे सांगत दैनंदिन जीवनातील आरोग्यदायी सवयींचे महत्त्व स्पष्ट केले.

श्री गणेश मित्र मंडळाचे अध्यक्ष गणेश सुंचू यांच्या हस्ते डॉक्टरांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी राहुल द्यावरकोंडा यांनी आभार मानले.

यावेळी आनंद रेब्बा, अशोक द्यावरकोंडा, दिनेश पासकंटी, संतोष सुंचु, साई पेंटा, रवी बोदुल, आदर्श येरवडे, राजेश कोंडुर, अशोक पेंटा, अंबादास कस्सा, अमोल कुडक्याल, राजनिवास पासकंटी, विठ्ठल दंडगळ, लक्ष्मण दंडगळ आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

शिबिरास नागरिकांसह बालगोपालांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरानंतर उपस्थितांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करा-अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, त्यानुषंगाने निवडणूक






आचारसंहिता लागू झाली आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने आचारसंहितेच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीत अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी विविध विभागांना आवश्यक त्या सूचना दिल्या. पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकांना आचारसंहिता लागू होत असल्याचे भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद आहे.

निवडणूक कालावधीत शासकीय विश्रामगृहाचा राजकीय बैठका किंवा अन्य राजकीय कारणांसाठी वापर होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच शासकीय वाहने पदाधिकारी व संबंधितांकडून जमा करून घेऊन त्यांचा निवडणूक आचारसंहितेचा भंग होणार नाही, अशा पद्धतीने वापर नियंत्रित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या कालावधीत कोणतेही उद्घाटन समारंभ अथवा आचारसंहितेच्या कक्षेत येणारे कार्यक्रम आयोजित करू नयेत, असेही स्पष्ट करण्यात आले. शासकीय वाहने मंत्र्यांसह कोणत्याही पदाधिकाऱ्यांना निवडणूक आचारसंहितेच्या अनुषंगाने वापरासाठी उपलब्ध करून देऊ नयेत, असेही निर्देश देण्यात आले.

**मंत्री दौऱ्यांसाठी स्वतंत्र व्हिडिओ पथक**

मंत्री अथवा इतर मान्यवरांच्या दौऱ्यांदरम्यान आवश्यक त्या बाबींचे चित्रीकरण व नोंदणी करण्यासाठी तहसीलदारांनी स्वतंत्र व्हिडिओ पथकाची नियुक्ती करावी, अशा सूचना देण्यात आल्या. हेलिपॅडचा वापर सर्व संबंधितांना नियम व उपलब्धतेनुसार समान पद्धतीने उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

निवडणूक कालावधीत माध्यमांशी संबंधित कामकाजासाठी जिल्हा माहिती अधिकारी यांच्या समन्वयाने

(पान २ वर)

# याचिका मागे घे, सभेला हजर राहू नको; अन्यथा जिवंत ठेवणार नाही

## भीमा साखर कारखाना मल्टीस्टेट करण्याविरोधातील याचिकाकर्त्यास व्हॉट्सॲपवर धमकी; मोहोळ पोलिसांत तक्रार

मोहोळ (कटूसत्य वृत्त):- भीमा सहकारी साखर कारखाना मल्टीस्टेट करण्याच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करणारे कोन्हेरी (ता. मोहोळ) येथील समाधान पांडुरंग शेळके यांना व्हॉट्सॲप संदेशाद्वारे धमकी देण्यात आल्याची घटना समोर आली आहे.

याचिका मागे घ्यावी आणि कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला हजर राहू नये, अन्यथा जिवंत ठेवणार नाही, अशा आशयाचा धमकीचा संदेश संबंधितांना पाठविण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.



समाधान शेळके यांनी भीमा सहकारी साखर कारखाना मल्टीस्टेट करण्याच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. दरम्यान, २६ सप्टेंबर रोजी टाकळी सिकंदर येथे भीमा सहकारी साखर कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर शेळके यांच्या व्हॉट्सॲपवर एका मोबाईल क्रमांकावरून धमकीचा संदेश पाठविण्यात आल्याचे त्यांनी मोहोळ पोलिसांत दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. कारखान्याबाबत दाखल केलेली याचिका मागे घेण्यास तसेच आगामी वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहू नये, अन्यथा जिवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी संबंधित मोबाईल क्रमांकावरून धमकीचा संदेश पाठविणाऱ्या व्यक्तीविरोधात मोहोळ पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. धमकीचा संदेश, संबंधित मोबाईल क्रमांक आणि या प्रकरणामागील नेमका प्रकार याबाबत पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल नाळे करीत आहेत.

दरम्यान, आगामी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या पार्श्वभूमीवर याचिकाकर्त्याला धमकीचा संदेश आल्याने या प्रकरणाकडे परिसराचे लक्ष लागले आहे.

## संपादकीय

# मतदार यादीतच लोकशाही अडकली!

मतदार हा लोकशाहीचा केंद्रबिंदू. त्याचे नाव मतदार यादीत असणे हा केवळ प्रशासकीय तपशील नाही, तर मतदानाचा घटनात्मक अधिकार प्रत्यक्षात बजावण्याची पूर्वअट आहे. त्यामुळे मतदार यादी शुद्ध करणे, मृत किंवा स्थलांतरित व्यक्तींची नावे वगळणे आणि बनावट नोंदी शोधणे हे निवडणूक आयोगाचे आवश्यक कर्तव्यच आहे. पण शुद्धीकरणाच्या नावाखाली एखादा खरा मतदारच मतदानाच्या प्रक्रियेबाहेर फेकला गेला, तर प्रश्न केवळ प्रशासनाच्या कार्यक्षमतेचा राहत नाही; तो लोकशाहीच्या विश्वासार्हतेचा बनतो.

पश्चिम बंगालमधील विशेष सखोल मतदार फेरतपासणी अर्थात डखठ प्रक्रियेबाबत सर्वोच्च न्यायालयात निवडणूक आयोगाने सादर केलेली आकडेवारी त्यामुळेच अस्वस्थ करणारी आहे. आयोगाच्या माहितीनुसार ३८ लाखांहून अधिक अपिले दाखल झाली असून त्यापैकी २२.२१ लाख अपिले ही मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या व्यक्तींनी नावे पुन्हा समाविष्ट करण्यासाठी केली आहेत. ३७ लाखांहून अधिक प्रकरणे अद्याप प्रलंबित आहेत.

याहून गंभीर बाब म्हणजे सुमारे १.२० लाख प्रकरणांची छाननी झाल्यानंतर त्यातील जवळपास ९३ टक्के व्यक्तींची नावे पुन्हा वैध ठरल्याचे आयोगाने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले. म्हणजे ज्यांच्या मतदारत्वावर शंका घेऊन त्यांना मतदानाच्या प्रक्रियेपासून दूर ठेवण्यात आले, त्यापैकी मोठ्या प्रमाणातील व्यक्ती अखेरीस पात्र मतदार ठरल्या.

याचा अर्थ आयोगाने जाणूनबुजून लोकशाहीचा घात केला, असा निष्कर्ष तातडीने काढणे योग्य ठरणार नाही. मात्र इतक्या मोठ्या प्रमाणात नागरिकांच्या नोंदींवर शंका निर्माण होऊन नंतर त्या शंका दूर होत असतील, तर फेरतपासणीची पद्धत, पडताळणीची प्रक्रिया आणि त्यातून होणारे नागरिकांच्या मतदानाच्या अधिकारावर परिणाम यांचा कठोर आढावा घेणे अपरिहार्य आहे.

कारण निवडणूक संपल्यानंतर एखाद्या नागरिकाला 'तुम्ही पात्र मतदार आहात' असे सांगून उपयोग काय? मतदानाची संधीच निघून गेली असेल, तर नंतर मिळालेली पात्रता त्याचा गमावलेला लोकशाही हक्क परत आणू शकत नाही.

याच ठिकाणी आयोगाच्या कार्यपद्धतीसमोर मूलभूत प्रश्न उभा राहतो. मतदार यादीतील चुकीची नोंद दुरुस्त करण्यासाठी यंत्रणा असावी; पण त्या यंत्रणेच्या चुकीमुळे पात्र नागरिकच मतदानापासून वंचित राहणार नाही ना, याची जबाबदारी कोणाची?

सर्वोच्च न्यायालयासमोरची आकडेवारी या प्रश्नाची तीव्रता वाढवते. आयोगाने दिलेल्या माहितीनुसार ३८,३१,४२९ अपिलांपैकी २२,२१,११८ अपिले वगळलेल्या मतदारांनी नावे पुन्हा समाविष्ट करण्यासाठी केली, तर १६,१०,३११ अपिले मतदार यादीत समाविष्ट केलेल्या नावांवर आक्षेप घेणारी आहेत.

इतका प्रचंड प्रलंबित भार असताना न्याय मिळण्याचा वेग हा स्वतःच चिंतेचा विषय आहे. सप्टेंबरमध्ये आयोगाने सर्वोच्च न्यायालयाला दिलेल्या माहितीनुसार केवळ सुमारे १.०२ लाख अपिलांचा निपटारा झाला होता, म्हणजे बहुतांश प्रकरणे अद्याप प्रलंबित होती.

निवडणूक आयोगाने ही प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्यासाठी अपीलीय यंत्रणा वाढवण्याचा प्रस्ताव मांडला आहे. तो स्वागतार्ह असला तरी प्रश्न केवळ अधिक लवाद नेमण्याचा नाही. प्रश्न आहे तो प्रक्रियेच्या विश्वासार्हतेचा.

मतदार यादी तयार करताना पारदर्शक निकष असावेत. नागरिकाला त्याचे नाव का वगळले गेले याची स्पष्ट माहिती मिळाली पाहिजे. हरकतीसाठी पुरेसा वेळ आणि सुलभ यंत्रणा असली पाहिजे. अपीलाचा निकाल निवडणुकीपूर्वी मिळेल, अशी व्यवस्था असली पाहिजे. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, पात्र मतदाराला मतदानाच्या दिवशीच आपले नाव यादीत नसल्याचे कळून त्याचा हक्क हिरावला जाणार नाही, याची हमी असली पाहिजे.

मतदार यादीतील शुद्धीकरणाला कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाही. पण 'शुद्धीकरण' आणि 'वंचितीकरण' यातील सीमारेषा अत्यंत स्पष्ट असली पाहिजे. बनावट मतदार शोधताना खरा मतदार गाळला गेला, तर प्रशासनाची चूक एका नागरिकाच्या बाबतीत मर्यादित राहत नाही; ती लोकशाहीच्या प्रक्रियेत थेट हस्तक्षेप करते.

याच पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांकडून आयोगावर होत असलेल्या आरोपांचीही स्वतंत्र आणि पुराव्याधारित चौकशी होणे आवश्यक आहे. कोणत्याही पक्षाला अनुकूल किंवा प्रतिकूल निकाल काढणे हे आयोगाचे काम नाही. त्याचे एकमेव कर्तव्य म्हणजे मतदाराचा विश्वास आणि निवडणूक प्रक्रियेची निष्पक्षता अबाधित ठेवणे.

म्हणूनच सर्वोच्च न्यायालयासमोर आता केवळ आकडेवारी सादर होऊन भागणार नाही. किती नावे वगळली? का वगळली? त्यापैकी किती पात्र ठरली? किती जणांना मतदान करता आले नाही? किती अपिले निवडणुकीपूर्वी निकाली काढली जाऊ शकली असती? आणि भविष्यात अशी परिस्थिती टाळण्यासाठी आयोग काय करणार? या प्रत्येक प्रश्नाचे स्पष्ट उत्तर देशाला मिळाल पाहिजे.

लोकशाहीची ताकद केवळ मतदानाच्या दिवशी दिसत नाही. लोकशाहीची खरी परीक्षा त्या मतदानाचा अधिकार प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत निर्भयपणे आणि अडथळ्याविना पोहोचतो की नाही, यात असते.

निवडणूक आयोग हा लोकशाहीचा पंच आहे. पंचावरच संशय निर्माण झाला, तर संपूर्ण सामन्याच्या निकालावर प्रश्नचिन्ह उभे राहते. म्हणून आयोगाने केवळ 'मतदार यादी शुद्ध केली' एवढे सांगून समाधान मानू नये; या प्रक्रियेत एकही पात्र मतदार अन्यायाने मतदानापासून वंचित राहिला नाही, याचा विश्वास देशाला द्यावा.

कारण मतदार यादीतील एक चुकीचे नाव ही प्रशासकीय चूक असू शकते; पण लाखो पात्र नागरिकांचे मतदानच धोक्यात आले, तर तो लोकशाहीच्या विश्वासाचा प्रश्न बनतो.

आता निरीक्षणांपेक्षा पारदर्शकता, आश्वासनांपेक्षा उत्तरदायित्व आणि आकडेवारीपेक्षा प्रत्येक मतदाराचा हक्क महत्त्वाचा आहे.

# सत्यशोधक समाजःसमतेच्या सामाजिक क्रांतीची वाटचाल

२४ सप्टेंबर हा महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. याच दिवशी १८७३ मध्ये महात्मा ज्योतिराव फुले यांनी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली. एकोणिसाव्या शतकातील भारतीय समाजव्यवस्थेत जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीदास्य, अज्ञान, धार्मिक कर्मकांड, सामाजिक विषमता आणि आर्थिक शोषण यांचे खोलवर रुजलेले स्वरूप पाहता सत्यशोधक समाजाची स्थापना ही केवळ एका संस्थेची निर्मिती नव्हती, तर प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेला विचारांच्या पातळीवर दिलेले मूलभूत आव्हान होते. जन्माच्या आधारावर माणसामाणसांत श्रेष्ठ-कनिष्ठता निर्माण करणाऱ्या व्यवस्थेऐवजी मानवतेवर, समतेवर, विवेकावर आणि शिक्षणावर आधारित समाज निर्माण करण्याचा प्रयत्न या चळवळीमागे होता. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात सत्यशोधक समाजाने निर्माण केलेली वैचारिक परंपरा पुढील अनेक सामाजिक चळवळींना प्रेरणा देणारी ठरली. महाराष्ट्राच्या गॅझेटियरमध्येही सत्यशोधक समाजाच्या स्थापनेचा संबंध ज्योतिराव फुले यांच्याशी जोडला असून, या चळवळीने सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील पुरोहितसत्तेच्या प्रभावाला आव्हान दिल्याचे नमूद केले आहे.

सत्यशोधक समाजाची स्थापना कोणत्या सामाजिक परिस्थितीत झाली हे समजून घेतल्याशिवाय या चळवळीचे ऐतिहासिक महत्त्व पूर्णपणे लक्षात येत नाही. त्या काळात समाजव्यवस्थेवर जन्माधिष्ठित जातिभेदाचा मोठा प्रभाव होता. शिक्षण, धार्मिक विधी, ज्ञानसंपादन आणि सामाजिक प्रतिष्ठा यांमध्ये मोठ्या प्रमाणात विषमता होती. बहुजन समाजातील अनेक घटक शिक्षणापासून दूर होते. स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार प्रत्यक्षात उपलब्ध नव्हता. विधवांचे जीवन अत्यंत कठीण होते. बालविवाह, अस्पृश्यता आणि सामाजिक बहिष्कार यांसारख्या प्रथा समाजातील मोठ्या घटकांच्या जीवनावर परिणाम करीत होत्या. या परिस्थितीत केवळ धार्मिक सुधारणा पुरेशा नाहीत, तर समाजातील सत्तासंबंध, ज्ञानाचे नियंत्रण आणि सामाजिक प्रतिष्ठेचे निकष यांचाही पुनर्विचार झाला पाहिजे, असा विचार ज्योतिराव फुले यांच्या कार्यातून पुढे आला.

ज्योतिराव फुले यांचे सामाजिक विचार त्यांच्या स्वतःच्या अनुभवातून आणि तत्कालीन समाजाच्या निरीक्षणातून विकसित झाले. त्यांनी शिक्षणाला सामाजिक मुक्तीचे प्रभावी साधन मानले. सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी केलेले कार्य भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात महत्त्वाचे आहे. १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी शाळा सुरू करण्याच्या कार्यापासून त्यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रयत्नांना व्यापक दिशा मिळाली. पुढे वंचित आणि तथाकथित अस्पृश्य समाजातील मुला-मुलींसाठी शिक्षणाची दारे उघडण्याचा प्रयत्न करण्यात आला. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षिका म्हणून या कार्यात सक्रिय सहभाग घेतला. त्यामुळे फुले दाम्पत्याचे कार्य हे केवळ स्त्रीशिक्षणापुरते मर्यादित नव्हते; ते शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक समतेची पायाभरणी करणारे व्यापक अभियान होते. उच्च शिक्षण किंवा ज्ञान काही मोजक्या घटकांची मक्तेदारी न राहता समाजातील सर्व घटकांना उपलब्ध झाले पाहिजे, हा या कार्याचा मूलभूत आशय होता.

सत्यशोधक समाजाच्या नावातच त्याच्या कार्याची दिशा दडलेली आहे. 'सत्याचा शोध घेणारा समाज' ही त्याची मूलभूत संकल्पना होती. परंपरेला केवळ परंपरा म्हणून स्वीकारण्याऐवजी तिची सामाजिक उपयुक्तता आणि मानवी परिणाम तपासले पाहिजेत, असा विवेकवादी दृष्टिकोन या चळवळीने पुढे आणला. व्यक्तीची प्रतिष्ठा तिच्या जन्मावर नव्हे, तर तिच्या माणूसपणावर आधारित असली पाहिजे, हा विचार सत्यशोधक समाजाच्या केंद्रस्थानी होता. त्यामुळे जात, जन्म, धार्मिक मध्यस्थी आणि सामाजिक दर्जा यांच्या आधारावर माणसाची किंमत ठरवण्याला या चळवळीने विरोध केला. सामाजिक समता ही केवळ धार्मिक किंवा नैतिक कल्पना नसून प्रत्यक्ष सामाजिक व्यवहाराचा आधार असली पाहिजे, अशी भूमिका या चळवळीच्या कार्यातून दिसून येते.

सत्यशोधक समाजाने धार्मिक कर्मकांडाच्या नावाखाली निर्माण झालेल्या सामाजिक विषमतेवरही प्रश्न उपस्थित केले. ज्योतिराव फुले यांच्या मते धार्मिक विधी आणि संस्कार यांवर काही विशिष्ट घटकांचे नियंत्रण राहिल्यामुळे सामान्य लोकांवर आर्थिक आणि सामाजिक अवलंबित्व निर्माण होत होते.

त्यामुळे विवाहासारख्या सामाजिक विधींमध्ये पुरोहिताची अनिवार्यता नाकारण्याचा प्रयत्न सत्यशोधक समाजाने केला. साधेपणा, सामाजिक समता आणि अनावश्यक खर्चाला विरोध यांना महत्त्व देणारे सत्यशोधक विवाह पुढे चळवळीचे वैशिष्ट्य ठरले. अशा प्रकारे सामाजिक सुधारणेचा प्रश्न केवळ विचारांच्या पातळीवर न ठेवता दैनंदिन जीवनातील प्रथा आणि व्यवहारांशी जोडण्याचे काम या चळवळीने केले.

या चळवळीचा स्त्रीप्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही महत्त्वाचा होता. स्त्रीला शिक्षणापासून दूर ठेवणे, बालविवाह, विधवांवरील अन्याय आणि स्त्रीच्या स्वातंत्र्यावर असलेली बंधने यांना सामाजिक विषमतेचा भाग म्हणून पाहण्याची आवश्यकता फुले दाम्पत्याच्या कार्यातून स्पष्ट झाली. सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी आणि स्त्रियांच्या आत्मसन्मानासाठी केलेले कार्य सत्यशोधक विचारांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचे उदाहरण आहे. स्त्रीशिक्षणाशिवाय समाजाची खरी प्रगती होऊ शकत नाही, कारण शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये विचारशक्ती, आत्मविश्वास आणि अधिकारांची जाणीव निर्माण होते. त्यामुळे सत्यशोधक चळवळीचा स्त्री-मुक्तीच्या इतिहासाशी असलेला संबंध अत्यंत महत्त्वाचा आहे.

सत्यशोधक समाजाची भूमिका केवळ जातिभेदाविरोधापुरती मर्यादित नव्हती. शेतकरी आणि श्रमिकांच्या आर्थिक प्रश्नांकडेही ज्योतिराव फुले यांनी लक्ष वेधले. ग्रामीण समाजातील शेतकरी कर्जबाजारीपणा, महसूलव्यवस्था, सावकारी आणि मध्यस्थांच्या शोषणाला सामोरे जात असल्याचे त्यांनी मांडले. शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथातून त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे तीव्र सामाजिक आणि आर्थिक विश्लेषण केले. सामाजिक विषमता आणि आर्थिक शोषण यांचा परस्परसंबंध समजून घेणे आवश्यक आहे, ही जाणीव त्यांच्या विचारांत दिसते. महाराष्ट्राच्या गॅझेटियरमध्येही सत्यशोधक समाजाने शेतकरी, सावकार आणि गावपातळीवरील आर्थिक-सामाजिक संबंधांशी संबंधित प्रश्नांकडे लक्ष दिल्याचे नमूद केले आहे.

सत्यशोधक समाजाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्याचा बहुजन समाजातील आत्मसन्मान जागवण्याचा प्रयत्न. सामाजिकदृष्ट्या कनिष्ठ मानल्या गेलेल्या समूहांनी स्वतःच्या जीवनाकडे कमीपणाच्या नजरेने पाहू नये, आपल्या अनुभवांना आणि श्रमांना प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, शिक्षणाचा अधिकार मिळाला पाहिजे आणि सामाजिक निर्णयप्रक्रियेत आपला सहभाग असला पाहिजे, अशी जाणीव या चळवळीने निर्माण केली. त्यामुळे सत्यशोधक समाज ही केवळ सुधारक संस्था न राहता सामाजिक आत्मभान निर्माण करणारी चळवळ ठरली. समाजातील वंचित घटकांना स्वतःच्या प्रश्नांकडे स्वतंत्रपणे पाहण्याची आणि संघटितपणे मांडणी करण्याची प्रेरणा मिळाली.

ज्योतिराव फुले यांच्या विचारांत 'मानव' हा केंद्रबिंदू होता. त्यांनी 'निर्मिक' या संकल्पनेचा उल्लेख करताना सृष्टीच्या निर्मात्यापुढे सर्व मानव समान असल्याचा विचार मांडला. जन्माच्या आधारे निर्माण केलेली श्रेष्ठ-कनिष्ठता ही मानवी मूल्यांशी विसंगत आहे, असा त्यांचा आग्रह होता. महाराष्ट्राच्या गॅझेटियरमध्ये फुले यांच्या विचारांमध्ये मानवतावाद आणि सामाजिक समतेचा आग्रह असल्याचे नमूद केले आहे. तसेच सत्यशोधक समाजाची सदस्यता जातीनुसार बंदिस्त नव्हती; मूलभूत तत्त्वांवर विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तींना त्यात स्थान मिळू शकत होते. त्यामुळे सत्यशोधक समाजाचा संघर्ष विशिष्ट व्यक्ती किंवा समुदायाविरुद्ध नसून जन्माधारित विषमता आणि सामाजिक वर्चस्वाच्या विचारसरणीविरुद्ध होता, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

सत्यशोधक समाजाच्या विचारांचा पुढील काळातील सामाजिक परिवर्तनावर परिणाम झाला. विसाव्या शतकाच्या प्रारंभी राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक समता, शिक्षण आणि मागास घटकांच्या प्रतिनिधित्वासाठी केलेल्या कार्याला सत्यशोधक परंपरेशी वैचारिक जवळीक होती. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात सत्यशोधक विचारसरणीने पुढे बहुजन आणि ब्राह्मणेतर सामाजिक चळवळींना वैचारिक आधार दिला. महाराष्ट्र गॅझेटियरच्या नोंदीनुसार, ज्योतिराव फुले यांच्या निधनानंतर काही काळ चळवळीची गती कमी झाली; पुढे राजर्षी शाहू महाराजांच्या नेतृत्वामुळे आणि आश्रयामुळे सत्यशोधक चळवळीला नव्या टप्प्यात गतिमानता मिळाली.

सत्यशोधक परंपरेचा प्रभाव पुढे भारतीय सामाजिक न्यायाच्या व्यापक प्रवाहातही दिसतो. जातिभेद, अस्पृश्यता, सामाजिक प्रतिनिधित्व, शिक्षण आणि मानवी प्रतिष्ठा यांसारखे प्रश्न पुढील सामाजिक आणि राजकीय चळवळींच्या केंद्रस्थानी आले. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर सत्यशोधक समाजाने 'सामाजिक स्तरीकरण' हा केवळ पारंपरिक सांस्कृतिक विषय नसून सत्ता, संसाधने, ज्ञान आणि प्रतिष्ठेच्या असमान वितरणाशी संबंधित प्रश्न आहे, हे अधोरेखित केले. म्हणूनच या चळवळीचे महत्त्व केवळ महाराष्ट्राच्या इतिहासापुरते मर्यादित राहत नाही. भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या अभ्यासात तिचे स्थान महत्त्वाचे आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ई-पीजी पाठ्यक्रमातील समाजशास्त्रीय अभ्याससामग्रीतही सत्यशोधक समाजाला भारतातील जातिविरोधी आणि अस्पृश्यताविरोधी सामाजिक चळवळींच्या संदर्भात महत्त्वाचे स्थान दिले आहे.

२४ सप्टेंबर २०२६ रोजी सत्यशोधक समाजाच्या स्थापनेला १५३ वर्षे पूर्ण होत असताना या चळवळीच्या विचारांकडे केवळ ऐतिहासिक स्मृती म्हणून पाहणे पुरेसे ठरणार नाही. आधुनिक भारताने संविधानाच्या माध्यमातून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मूल्ये स्वीकारली आहेत. अस्पृश्यता कायद्याने रद्द झाली आहे, शिक्षणाचा विस्तार झाला आहे, महिलांसाठी आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांसाठी विविध संवैधानिक व कायदेशीर तरतुदी अस्तित्वात आहेत. तरीही सामाजिक पूर्वग्रह, जातीय भेदभाव, स्त्री-पुरुष विषमता, शैक्षणिक संधीतील तफावत, आर्थिक विषमता आणि सामाजिक बहिष्करण यांसारखी आव्हाने पूर्णपणे संपलेली नाहीत. अशा परिस्थितीत सत्यशोधक विचारांचा अर्थ वर्तमान सामाजिक वास्तवाचा विवेकाने शोध घेणे असा होतो.

आजच्या डिजिटल आणि माहितीप्रधान युगात 'सत्यशोधन' या संकल्पनेला आणखी एक नवा अर्थ प्राप्त झाला आहे. सामाजिक माध्यमांवर माहितीचा प्रचंड वेगाने प्रसार होत असताना अफवा, अपप्रचार, पूर्वग्रहदूषित माहिती आणि अर्धसत्ये यांपासून सत्य वेगळे करण्यासाठी चिकित्सक विचारशक्ती आवश्यक आहे. फुले यांनी शिक्षण आणि विवेकाला दिलेले महत्त्व आजच्या काळात म्हणूनच अधिक अर्थपूर्ण ठरते. शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळवणे नव्हे; तर प्रश्न विचारण्याची, पुराव्यांची चिकित्सा करण्याची, अन्याय ओळखण्याची आणि विवेकाधिष्ठित निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे होय. या अर्थाने सत्यशोधक समाजाचा वारसा आधुनिक ज्ञानसमाजासाठीही उपयुक्त आहे.

सत्यशोधक समाजाच्या स्थापनेचे स्मरण करताना फुले दाम्पत्याच्या कार्यातील परस्परपूरकता लक्षात घेणेही आवश्यक आहे. ज्योतिराव फुले यांनी सामाजिक विषमतेविरुद्ध वैचारिक आणि संघटनात्मक संघर्ष उभा केला, तर सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण आणि स्त्री-मुक्तीच्या क्षेत्रात त्याला प्रत्यक्ष कृतीची जोड दिली. फातिमा शेख यांच्यासह अनेक सहकाऱ्यांनीही शिक्षणाच्या प्रसाराच्या कार्यात योगदान दिले. त्यामुळे सामाजिक परिवर्तन हे एका व्यक्तीचे कार्य नसून सामूहिक प्रयत्नांची प्रक्रिया असते, हा धडा सत्यशोधक परंपरेतून मिळतो.

सत्यशोधक समाजाच्या विचारांचा आणखी एक महत्त्वाचा संदेश म्हणजे सामाजिक परिवर्तनासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात. कायद्याने समानता घोषित केली तरी सामाजिक मनोवृत्तीत बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण, संवाद, संघटन आणि संवेदनशीलता आवश्यक असते. जातीय किंवा लैंगिक पूर्वग्रह केवळ कायद्याने नाहीसे होत नाहीत; ते दैनंदिन व्यवहार, भाषा, कुटुंब, शिक्षणसंस्था, रोजगार आणि सामाजिक संबंधांच्या पातळीवर बदलावे लागतात. म्हणूनच सत्यशोधक विचार आज सामाजिक समतेच्या व्यवहार्य कार्यक्रमाशी जोडण्याची गरज आहे.

आजच्या पिढीसमोर रोजगार, शिक्षण, तंत्रज्ञान, पर्यावरण, ग्रामीण विकास आणि सामाजिक न्याय अशी अनेक नवी आव्हाने आहेत. या सर्व प्रश्नांकडे पाहताना सामाजिक विषमतेचा विचार करणे आवश्यक आहे. कोणाला शिक्षणाची संधी मिळते, कोण डिजिटल साधनांपासून दूर राहतो, कोणाला रोजगाराच्या समान संधी मिळतात, ग्रामीण आणि शहरी भागातील सुविधांमध्ये किती तफावत आहे, महिलांना आणि वंचित घटकांना निर्णयप्रक्रियेत किती स्थान मिळते, यांसारखे प्रश्न विचारणे म्हणजेच आधुनिक अर्थाने सत्यशोधन होय. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठेला समान महत्त्व देणारी विकासाची संकल्पना ही सत्यशोधक विचारांशी सुसंगत ठरते.

सत्यशोधक समाजाचा वर्धापनदिन हा त्यामुळे केवळ ज्योतिराव फुले यांच्या स्मरणाचा दिवस नाही; तो समाजाने स्वतःचे आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. आपल्या आजूबाजूला अजूनही कोणत्या स्वरूपाची विषमता आहे, कोणत्या समूहांना संधींपासून वंचित राहावे लागते, शिक्षण आणि ज्ञानाचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचतो का, स्त्री-पुरुष समानतेची कल्पना प्रत्यक्ष जीवनात किती उतरली आहे आणि सामाजिक प्रतिष्ठेचे निकष अजूनही जन्म, जात किंवा आर्थिक स्थितीवर आधारित आहेत का, हे प्रश्न प्रत्येकाने विचारण्याची आवश्यकता आहे.

१८७३ मध्ये ज्योतिराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली तेव्हा त्यांनी सामाजिक परिवर्तनासाठी सत्य, विवेक, शिक्षण आणि समतेचा मार्ग स्वीकारला. त्या काळातील परिस्थिती आणि आजचे सामाजिक वास्तव यांत मोठा फरक असला तरी मानवी प्रतिष्ठा, समानता आणि न्याय यांची आवश्यकता कायम आहे. म्हणून सत्यशोधक समाजाचा वारसा जपणे म्हणजे केवळ भूतकाळाचा गौरव करणे नव्हे, तर वर्तमानातील विषमता ओळखून तिच्यावर चिकित्सक विचार करणे आणि अधिक समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणे होय. सत्याचा शोध हा एखाद्या एका दिवसापुरता मर्यादित नसतो; तो सतत चालणारी सामाजिक आणि बौद्धिक प्रक्रिया आहे. २४ सप्टेंबरचा सत्यशोधक समाज वर्धापनदिन म्हणूनच प्रत्येकाला प्रश्न विचारण्याची, विवेक जागवण्याची आणि माणसामाणसांतील भेद कमी करून समतेचा समाज घडवण्याची प्रेरणा देणारा दिवस ठरतो. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा खरा सन्मान त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात नसून शिक्षण, समता, बंधुता, स्त्रीसन्मान आणि सामाजिक न्याय या मूल्यांना आपल्या दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष स्थान देण्यात आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल –**
bagate.rajendra5gmail.com

## * पान १ वरुन *

*** दुष्काळी परिस्थितीत शासन.....**

हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. पावसातील दीर्घ खंडामुळे शेतकऱ्यांसमोर पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा तसेच पुढील हंगामासाठी पाण्याची उपलब्धता यासारखी आव्हाने निर्माण झाली आहेत. या सर्व बाबींचा शासनाकडून सर्वंकष विचार करून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांचा शेतकऱ्यांशी संवाद

यावेळी शेतकरी दमयंती गादेकर, संध्या गरड, वंदना गादेकर, राहुल पाटील यांच्यासह नुकसानग्रस्त शेतकरी अन्य उपस्थित राहून मुख्यमंत्री महोदय यांच्यासमोर पावसा अभावी झालेल्या शेती पिकाच्या नुकसानीबाबत आपल्या व्यथा मांडल्या तसेच शासनाकडून त्वरित मदत मिळावी अशी मागणी केली. यावेळी मुख्यमंत्री यांनी या शेतकऱ्यांची संवाद साधून त्यांना धीर दिला. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असून आपल्याला लवकरात लवकर मदत दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

१३० दिवस पुरेल इतका चारा; गरजेनुसार छावण्या-

जिल्ह्यात सुमारे १३० दिवस पुरेल इतका चारा उपलब्ध असला तरी तालुक्यांमध्ये चाऱ्याचे प्रमाण असमान आहे. त्यामुळे आवश्यकतेनुसार चारा छावण्या सुरू करण्याची सरकारची पूर्ण तयारी आहे. तसेच अन्नधान्य, पाणी आणि मुलांच्या शिक्षणावर दिलासादायक निर्णय घेतले जातील. लातूरप्रमाणेच सोलापूरमध्ये काही बँकांनी दुष्काळकाळात शेतकऱ्यांच्या खात्यांवर अवाजवी व्याज आकारल्याच्या तक्रारी आल्या होत्या. यावर शासनाने कठोर भूमिका घेतल्याने बँकांनी चूक मान्य केली असून, शेतकऱ्यांवर वाढीव व्याजाचा बोजा पडू दिला जाणार नाही.

बार्शीच्या पाणीप्रश्नावर तरुणाची आर्त हाक-

दरम्यान, सोलापूरच्या बार्शी तालुक्यातील पाणीप्रश्नाचा मुद्दा एका तरुणाने मुख्यमंत्र्यांसमोर मांडला. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांशी मुख्यमंत्री संवाद साधत असताना समाधान शिंदे या तरुणाने त्यांच्याशी संवाद साधला. बार्शी तालुक्यात पाण्याची तीव्र टंचाई असून, त्याचा परिणाम शेतीसोबतच सामाजिक जीवनावरही होत असल्याचं समाधान शिंदे यांनी सांगितलं. बार्शी तालुक्याला उजनी धरणातून पाणी देण्याची मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

*** निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर.....**

मीडिया कक्षाची स्थापना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच शासकीय कार्यालये व परिसरातील आचारसंहितेच्या अनुषंगाने असलेले पोस्टर, बॅनर आदी काढून त्याबाबतचा अहवाल निवासी उपजिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

तातडीच्या कामांसाठी आवश्यक प्रशासकीय मान्यता घेण्याचे निर्देश

निवडणूक कालावधीत तातडीच्या व अत्यंत महत्त्वाच्या कामांसाठी संबंधित विभागांनी आपल्या प्रशासकीय विभागाकडून आवश्यक त्या तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेऊनच कार्यवाही करावी, अशा सूचना देण्यात आल्या. तसेच शासकीय विश्रामगृहात कोणत्याही प्रकारच्या राजकीय बैठका होणार नाहीत, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले.

निवडणूक बंदोबस्ताचे नियोजन

निवडणुकीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था तसेच सुरक्षा व्यवस्थेचे काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. शहरी भागासाठी पोलीस आयुक्त कार्यालयाने, तर ग्रामीण भागासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयाने संबंधित तालुका पोलीस ठाण्यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात, असे निर्देश देण्यात आले.

प्रत्येक मतदारसंघासाठी निवडणूक बंदोबस्ताकरिता नियुक्त करण्यात येणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे निश्चित करून त्यानुसार आवश्यक नियोजन पूर्ण करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी (महसूल) लक्ष्मण कसेकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) सूर्यकांत भुजबळ, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त विना ज्ञानेश्वर पवार, सहायक पोलीस निरीक्षक कांचन राजेंद्र कानडे, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी आसिफ मुलानी, मनपा प्रशासन अधिकारी मल्हारी माने, सोलापूर महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी सतीश कोपूरवाड उपस्थित होते.

**विघ्नहर्ता**

प्रथम तुला वंदितो
सर्वात तुला पाहतो
भक्तीचा हा अथांग सागर,
विघ्नहर्त्याचाच जयजयकार,
नाव तुझे गणेश
परभ्रम्ह, विष्णू महेश
सन मांगल्याचा,,,
गौरी गणपतीचा,,,
चार वेद, सहा शास्त्र, अठरा
पुराणांचा गुणपती...
चोदा विद्या, चौंसष्ट कलां चा
आदिपती...
तुला आवडतात दुर्वा मोदक,
क्षणोक्षणाला मारतो मी तुला
हाक,
नावे तुझी ही बारा,
खेळ तुझाच हा सारा...
आयुष्य अर्पण तुलाच मी करतो
साऱ्यात हीं मी तुलाच पाहतो...!
गणपती बप्पा मोरया...
मंगल मुर्ती मोरया...

**मयुरी विश्वनाथ बाबर**
**९११२४४३३४३**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, **संपादकःश्री.पांडूरंग हरिदास सुरवसे** यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर-४१३००३ येथे छापून येथूनच प्रसिध्द केले. कार्यालयः- एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर-४१३००३
फोन- २१७३५५०५९२ **RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो.(९७६५३९०३३९) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो.(९६५७०६९०६९) कायदा सल्लागारः ॲड.खतीब वकील.**
It is owned by Shri Pandurang Haridas Survase, Editor, Publisher, Sanskruti Printing Press F-3, Vrundavan Park, Hotgi Road, Solapur 413003. Printed here F-3 Vrundavan Park Hotagi Road Solapur 413003 Published from Office - F-3 Vrindavan Park Hotgi Road Solapur 413003 Phone-2173550592 Editor Pandurang Suravase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No . MAHMAR 2006/17624**

# विठ्ठलराव शिंदे कारखान्यास आर्थिक व्यवस्थापनासाठी पुरस्कार प्रदान

टेंभुर्णी(कटूसत्य वृत्त):- विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि. या कारखान्यास नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटीव्ह शुगर फॅक्टरीज लि.नवी दिल्ली यांचेकडून सन २०२४-२०२५ साठी उच्च साखर उतारा विभागातील आर्थिक व्यवस्थापनासाठीचा तिसरा पुरस्कार नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला. विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्यास नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटीव्ह शुगर फॅक्टरीज लि.नवी दिल्ली यांचेकडून सन २०२४-२०२५ साठी उच्च साखर उतारा विभागातील आर्थिक व्यवस्थापनासाठी तिसरा पुरस्कार जाहीर झालेला होता. सदर पुरस्काराचा वितरण समारंभ



मंगळवार दि.२२/०९/२०२६ रोजी नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटीव्ह शुगर फॅक्टरीज लि.या संस्थेच्या सन २०२५-२६ चे वार्षिक सर्वसाधारण सभेत पार पडला.

या पुरस्काराचे वितरण केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री मा.नितीन गडकरी यांचे शुभहस्ते व केंद्रीय कृषी राज्यमंत्री मा.कृष्णपाल गुर्जर, महाराष्ट्र राज्याचे सहकारमंत्री मा.बाबासाहेब पाटील तसेच पंजाब, हरियाणा, छत्तीडगड, गुजरात राज्याचे कृषिमंत्री, नॅशनल फेडरेशनचे अध्यक्ष मा.हर्षवर्धन पाटील, कार्यकारी संचालक प्रकाश नाईकनवरे यांच्या उपस्थितीत करणेत आले. कारखान्याचे संस्थापक चेअरमन मा.आ. बबनदादा शिंदे यांचे कुशल नेतृत्व व मार्गदर्शनाखाली यापूर्वी कारखान्यास चाचणी गळीत हंगामामध्ये विक्रमी ऊस गाळप, उत्तम आर्थिक व्यवस्थापन, उच्चांकी साखर निर्यात, उच्चांकी ऊस गाळप यासाठी देश व राज्यपातळीवरील २८ पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. सदर पुरस्कार वितरण समारंभासाठी पंचायत समिती कुर्डूवाडीचे मा.सभापती तथा कारखान्याचे संचालक विक्रमसिंह शिंदे, राजेश खोत, विलास कौलगे, सचिन देशमुख, संजय लोकरे,जितेंद्र गायकवाड, पंडीतराव पाटील, कैलास तोडकरी,राजाराम नाळे, श्रीकांत पाटील,प्रदीप चौगुले, कार्यकारी संचालक संतोष डिग्रजे, जनरल मॅनेजर पोपट येलपले व फायनान्स मॅनेजर दिलीप लव्हटे उपस्थित होते.

# संकल्प सेवा अभियानात ग्रामस्थांना चांगल्या सेवा द्या- सिईओ कुशल जैन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- संकल्प सेवा अभियानात ग्रामस्थांनी चांगल्या सेवा द्या. स्वच्छ स्वच्छता ही सेवा २०२६ अंतर्गत उपक्रम यशस्वीपणे राबवा असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभाग अंतर्गत सोलापूर जिल्ह्यात सेवा संकल्प अभियान अंतर्गत मंगळवेढा पंचायत समितीस सोलापूर जिल्हा परिषदेचे सिईओ कुशल जैन यांनी भेट दिली.

एक पेड मॉ. के नाम अंतर्गत वृक्ष लागवड करण्यात आली. मंगळवेढा तालुक्यातील बोराळे व




माचणुर येथे वृक्षारोपण करून शाळा व अंगणवाडींना भेट देऊन विद्यार्थ्यांची संवाद साधला. त्यांचे समवेत ग्रामीण विकास यंत्रणा विभागाचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, ग्रामपंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, गटविकास अधिकारी जास्मिन शेख, इतर अधिकारी व पंचायत अधिकारी उपस्थित होते.

सेवा संकल्प अभियान, स्वच्छता ही सेवा २०२६, मुख्यमंत्री समृध्द पंचायराज अभियान, घरकुल, शौचालय, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, घरपट्टी व पाणी पट्टी वसुली, जी राम जी योजना , शैक्षणिक गुणवत्ता व शाळा खाल्यांची पाहणी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी केली. सेवा संकल्प अभियाना सेवा देणेचे आवाहन केले.

या प्रसंगी घरकुल लाभार्थ्यांचा प्रवेश सिईओ कुशल जैन यांचे प्रमुख उपस्थित करणेत आला. विस्तार अधिकारी प्रकाश शिवशरण, कृषी विस्तार अधिकारी डोरले, ग्रामपंचायत अधिकारी जमीर मुलाणी, ग्रामपंचायत अधिकारी संगीता माने, माचनूर, स्वच्छ भारत मिशनचे एकनाथ जगताप व धर्मराज संखनवरू उपस्थित होते.

# समर्थ स्वामीच्या कुटुंबीयांच्या मदतीला धावून आले 'देवाभाऊ'

सोलापूर(कटूसत्य वृत्त):- भटक्या कुत्र्याने चावा घेतल्यामुळे रेबीज होऊन मृत पावलेल्या घोंगडे वस्ती येथील समर्थ स्वामी या विद्यार्थ्याच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून विशेष बाब म्हणून ३ लाख ५० हजार रुपये तर विद्यार्थी अपघात अनुदान योजनेतून दीड लाख असे एकूण पाच लाख रुपयांची मदत शासनाकडून करण्यात येणार आहे.

याकरिता आमदार देवेंद्र कोठे यांनी शासनाकडे पाठपुरावा केला होता.

घोंगडे वस्ती येथील समर्थ स्वामी या विद्यार्थ्यास भटक्या कुत्र्याने चावा घेतल्यामुळे रेबीजची लागण होऊन त्याचा २३ जुलै



रोजी दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्याच्या कुटुंबीयांना शासनाकडून मदत मिळावी याकरिता आमदार देवेंद्र कोठे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली होती.

वास्तविक पाहता रेबीजने मृत्यू होण्याच्या घटनेत एक लाख रुपये इतकी मदत करण्यात येते. परंतु आमदार देवेंद्र कोठे यांच्या विनंतीवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फेरप्रस्ताव मागवून स्वामी कुटुंबीयांस ३ लाख ५० हजार रुपये इतकी मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मंजूर केली आहे. त्याचबरोबर विद्यार्थी अपघात अनुदान योजनेच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दीड लाख रुपये अशी एकूण पाच लाख रुपयांची मदत समर्थ स्वामी यांच्या कुटुंबीयांना मिळणार आहे.

**नागरिकांच्या मदतीला देवाभाऊंचे सर्वोच्च प्राधान्य**

राज्यातील विशेषतः सोलापुरातील सर्वसामान्य गरजू नागरिकांच्या मदतीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेहमीच सर्वोच्च प्राधान्य राहिले आहे. समर्थ स्वामी या विद्यार्थ्याच्या दुर्दैवी मृत्यूमुळे अस्वस्थ झालेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विशेषबाब म्हणून अधिकची मदत देण्याची विनंती केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्वरित मागणी करत ५ लाख रुपयांची मदत केली आहे. सोलापूरकरांच्या आरोग्यासाठी आगामी काळातही गरज लागेल तेंव्हा अधिकाधिक मदत करण्यास कटिबध्द आहे.

**-देवेंद्र कोठे, आमदार, शहर मध्य**

# विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने गणेशोत्सव व्याख्यानमालेचे आयोजन

अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- अक्कलकोट येथे विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही १४ व्या गणेशोत्सव व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेतून गणेशोत्सवाच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक, साहित्यिक आणि सामाजिक विषयांवरील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, या माध्यमातून बौद्धिक व सामाजिक प्रबोधनाचा उद्देश असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

महर्षी विवेकानंद समाज कल्याण संस्थेचे ज्येष्ठ संचालक तथा विवेकानंद प्रतिष्ठानचे मार्गदर्शक मल्लिनाथ कल्याणशेट्टी सर यांनी पत्रकार परिषदेत व्याख्यानमालेची माहिती दिली. यावेळी विवेकानंद प्रतिष्ठानचे सदस्य मल्लिकार्जुन मसुती सर,




अशोक येणगुरे, मनोज कल्याणशेट्टी, संतोष जिरोळे, गुरुपादप्पा आळगी तसेच व्यवस्थापक चंद्रकांत दसले आदी उपस्थित होते.

व्याख्यानमालेतील कार्यक्रम २९ सप्टेंबर २०२६ : तुफान विनोदी नाटक 'शिक्षामोर्तब' प्रमुख कलाकार कांचन पगारे, कृतिका तुळसकर, स्नेहा पराडकर आणि सागर कारंडे ३० सप्टेंबर २०२६ : 'मेर्मबंधातली ठेव' भावगीते, भक्तिगीते व चित्रपटगीते सादरकर्ते प्रथमेश लघाटे व मुग्धा वैशंपायन १ ऑक्टोबर २०२६ : सुप्रसिद्ध कवयित्री गुंजन पाटील यांचा 'जाऊ कवितांच्या गावा' २ ऑक्टोबर २०२६ : पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे व पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे यांच्याशी 'मेळघाटातील आरोग्यदूत' या विषयावर माधव देशपांडे संवाद साधणार. ३ ऑक्टोबर २०२६ : अमृतवक्ता मा.स्वानंद बेदरकर यांचा 'वंद्य वंदे मातरम्' ४ ऑक्टोबर २०२६ : 'म्हणून स्वातंत्र्यवीर' या कार्यक्रमात लेखक नितीन वाघ, प्रमुख कलाकार प्रसन्न केतकर व संच सहभागी होणार आहेत. ही व्याख्यानमाला उत्साहात पार पडणार असून,

रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# साने गुरुजी शिक्षक पतसंस्थेचे पुरस्कार जाहीर

सोलापूर(कटूसत्य वृत्त):- साने गुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्थेचे गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर झाले असून रविवार, दिनांक २७ सप्टेंबर रोजी वालचंद कॉलेज समोरील लोटस मल्टीपर्पज हॉल येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्यांचा गौरव होणार असल्याची माहिती पतसंस्थेचे संचालक सुनील चव्हाण यांनी दिली.

पुरस्कार प्राप्त शिक्षक व शाळा उपक्रमशील मुख्याध्यापिका ज्ञानेश्वरी संगीतराव (मुख्याध्यापिका, बापूजी प्राथमिक शाळा) गुणवंत शिक्षक पुरस्कार सुगंधा कांबळे, (गौतम विद्यालय



),प्राजक्ता भोसले, सुरवसे प्राथमिक शाळा), संगीता फडतरे, (पंचशील प्राथमिक शाळा )उषा शिरसागर, (श्री बसवेश्वर मराठी प्राथमिक शाळा), सपना पावाडे, (कै. राजेश कोठे प्राथमिक शाळा) सेवाभावी सेवक बलराज धजाल (शारदा स्कूल ) आदर्श शाळा ज्ञानगंगा प्राथमिक मराठी विद्यालय. सन्मानचिन्ह, शाल व बुके देऊन या पुरस्कारा प्राप्त शिक्षकांचा गौरव करण्यात येणार आहे. प्रशासनाधिकारी मल्हारी माने, वेतन पथक अधीक्षक भरत कासले राजशेखर शिवदारे शंकर चौगुले संजय साळुंखे नरेंद्र गंभीरे मनीष बांगर राजेंद्र कुलकर्णी चंद्रकांत अवताडे गुलाब मुल्ला यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे.

या कार्यक्रमास सर्वांनी वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन चेअरमन उल्हास बिराजदार, सचिव आप्पाराव इटेकर, व्हाईस चेअरमन फरजाना रचभरे,

महादेवी पाटील वीरभद्र यादवाड, विनोद आगलावे, भीमराया कापसे, मुरलीधर कडलासकर सचिन चौधरी, भाऊसाहेब मोरे, धनाजी मोरे, शिवानंद हिरेमठ व जयंत गायकवाड यांनी केले आहे.

# सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली शाळांच्या कायापालटाचे नियोजन




**गुणवत्तावाढीसाठी आवश्यक सुविधा कमी पडू देणार नाही**

शाळांची भौतिक सुविधा सक्षम करण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला समान महत्त्व देणे आवश्यक आहे. गुणवत्तावाढीसाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक सुविधा व साधनसामग्रीमध्ये कमतरता राहू देणार नाही. प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना चांगले, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण मिळावे, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील.

**- चेतनसिंह केदार-सावंत सभापती, आरोग्य व शिक्षण समिती, जि. प. सोलापूर**

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या सेवाभावी वाटचालीच्या निमित्ताने दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत देशभरात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने ना.जयकुमार गोरे, मंत्री ग्रामविकास व पंचायत राज तथा पालकमंत्री सोलापूर जिल्हा यांच्या संकल्पनेतून तसेच जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या 'शैक्षणिक सुविधा व गुणवत्ता विकास अभियानाला' गती देण्यात आली आहे. पालकमंत्र्यांच्या सोमवारच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद शिक्षण विभागाने जिल्ह्यातील शाळांच्या भौतिक सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता व श्रेणीनिहाय स्थितीचा सविस्तर आढावा घेत तयारी पूर्ण केली आहे. *यासंदर्भात जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समितीचे सभापती इंद्रजीत पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, आरोग्य व शिक्षण समितीचे सभापती चेतनसिंह केदार - सावंत आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी विशाल मुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिक्षण विभागाची आढावा बैठक घेण्यात आली. जिल्हा परिषद शाळांचे उपलब्ध मूलभूत, शैक्षणिक, सुरक्षितता व आधुनिक सुविधांच्या आधारे ए, बी, सी आणि डी अशा श्रेणींमध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे. विशेषतः डी श्रेणीतील शाळांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत त्यांना सी, बी आणि पुढे ए श्रेणीत आणण्यासाठी शाळानिहाय नियोजन करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. शाळांमध्ये वर्गखोल्या, पाणीपुरवठा, स्वच्छतागृहे, विद्युतीकरण, किचन शेड, संरक्षण भिंत, क्रीडांगण, ग्रंथालय, शैक्षणिक साहित्य, प्रयोगशाळा, हँडवॉश स्टेशन, रॅम्प, संगणक सुविधा, इंटरनेट, CCTV, इंटरॅक्टिव्ह पॅनेल आदी सुविधांचा आढावा घेण्यात आला. धोकादायक इमारतींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या ठिकाणी स्ट्रक्चरल ऑडिट करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

तसेच शिक्षण विभाग व बांधकाम विभागातील अभियंत्यांची संयुक्त बैठक घेऊन शाळांच्या भौतिक सुविधांबाबत प्राधान्यक्रम निश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले. सर्व गटशिक्षणाधिकारी, समग्र शिक्षा अभियानातील अभियंत्यांनी तालुकानिहाय शाळांचा आढावा दिला.

# अनगरच्या मुलींची रग्बीमध्ये बाजी ;पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड

अनगर (कटूसत्य वृत्त):- जिल्हा क्रीडा परिषद आयोजित सोलापूर जिल्हास्तरीय रग्बी स्पर्धा टेंभुर्णी येथील शारदे गुरुकुल येथे पार पडल्या. या स्पर्धेत कै. शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अनगरच्या १७ वर्षे वयोगटातील मुलींनी उल्लेखनीय कामगिरी करत विजेतेपद पटकावले. या कामगिरीमुळे अनगरच्या संघाची पुणे विभागीय रग्बी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. अनगरच्या संघाचा सामना संत सावता माळी विद्यालय, अरण येथील संघाविरुद्ध झाला. या



सामन्यात अनगरच्या खेळाडूंनी दमदार खेळाचे प्रदर्शन करत विजय मिळविला. या यशस्वी संघात श्रावंती शंकर बिस्वास, ईश्वरी जयराम शिंदे, प्रणिती सुनील रणदिवे, श्रावणी रणजीत थिटे, समृद्धी महादेव कापसे, संजीवनी दादाराव थिटे, मानसी तुळसीदास गरगडे, कशिश जयकुमार शिंगटे, श्रुती मारुती करंडे, ऋतुजा दत्तात्रय शिंदे, वैभवी मारुती वराळे व प्रियंका सोमनाथ लोंढे यांचा समावेश आहे. या खेळाडूंना क्रीडा प्रशिक्षक दाजी गुंड, रवींद्र बोडके, हरिदास शिंदे व पंढरीनाथ थिटे यांचे मार्गदर्शन लाभले. श्रीअनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत ढोले यांच्या हस्ते यशस्वी खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य महादेव चोपडे, उपप्राचार्य माधव खरात, पर्यवेक्षक राजेंद्र डोके, क्रीडाशिक्षक चंद्रकांत सरक, विलास गुंड, अर्चना गुंड, पंढरीनाथ थिटे, हरिदास शिंदे आदी उपस्थित होते. यशस्वी खेळाडू व मार्गदर्शक शिक्षकांचे राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील, लोकनेते कारखान्याचे चेअरमन बाळराजे पाटील, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील अभिनंदन केले.

# मानसिक आरोग्य व ताणतणाव व्यवस्थापनावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

बार्शी (कटूसत्य वृत्त):- कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषि महाविद्यालय,बार्शी येथे २२ सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्याच्या दृष्टीने 'मानसिक आरोग्य व ताणतणाव व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. जगदाळे मामा हॉस्पिटल,बार्शी येथील डाएटिशियन व मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अनुष्का शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांनी मानसिक व शारीरिक आरोग्याची योग्य काळजी कशी घ्यावी, दैनंदिन जीवनातील ताणतणावाचे व्यवस्थापन कसे करावे,



व्यसनांपासून दूर कसे राहावे, तसेच नैराश्य (Depression) व चिंता (Anxiety) यांसारख्या मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.तसेच अभ्यासातील एकाग्रता वाढविण्यासाठी आवश्यक जीवनशैली, आहार, झोप, व्यायाम आणि सकारात्मक विचारसरणीचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.या मार्गदर्शनपर कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून तज्ज्ञांशी संवाद साधला.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मानसिक आरोग्याला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. एस.कुलकर्णी,प्रा.गणेश जाधव, प्रा.ए.आदलिंगे आणि डॉ.महेश गुरव यांनी विशेष प्रयत्न केले.

# श्री शमी विघ्नेश गणेश मंदिरात पोलिस अधिकाऱ्यांच्या हस्ते पूजा

अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत न्यासाच्या श्री शमी विघ्नेश गणेश मंदिरात सोमवारी सायंकाळी ७ वा.

अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याचे सहा.पोलीस निरीक्षक- अमोल पन्हाळकर यांच्या हस्ते पूजा संपन्न झाली. या प्रसंगी न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष



अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते सहा.

पोलीस निरीक्षक- अमोल पन्हाळकर यांचा सत्कार करण्यात आला.

न्यासाचे सचिव शामराव मोरे काका, पो.हे.कॉ.धोंडीबा ठेंगळे हे उपस्थित होते. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथील शमीवृक्षाखाली गेल्या ३३ वर्षा पूर्वी श्री गणेशाची स्थापना करून सुंदर असे मंदिर व सभामंडप बांधण्यात आले आहे.

श्री स्वामी समर्थांच्या पावन भूमीवर श्री शमीविघ्नेश गणेश असल्याने त्याचे स्थान व महात्म्य अलौकिक आहे. यावेळी मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, संजय कुलकर्णी, सोमकांत कुलकर्णी, बाबुशा महिंद्रकर, प्रा.शरणप्पा अचलेर, रोहित खोबरे,सौरभ मोरे, शुभम सावंत, वैभव मोरे, विशाल कलबुर्गी, आकाश गडकरी, मुख्य सुरक्षा रक्षक महादेव अनगले, अनिल गवळी, अप्पा हंचाटे, सतीश महिंद्रकर, धानप्पा उमदी,रमेश हेगडे, तानाजी पाटील, राजू पवार, प्रसाद हुल्ले, धनंजय निंबाळकर, विलासराव रेड्डी, शेकप्पा मिनगले, भिमशा शिंदे, लक्ष्मण हिळळी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.